# शिवा ट्रस्टचे मोफत रोग निदान शिबीर उत्साहात

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील शिवा ट्रस्ट संचलित यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने टाकळीभान, पाचेगाव येथे स्वातंत्र्यादिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त मोफत रोगनिदान शिबीर व आयुर्वेद जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवातंर्गत टाकळीभान व पाचेगाव येथील सर्व नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबीरामध्ये संधेवात, आमवात, मणक्याचे आजार, पोटाचे विकार, त्वचा रोग, किडणीचे रोग, ह्दयरोग, दमा, लहान मुलांचे आजार, स्त्रीयांचे आजार आदी आजारांवर उपचार करण्यात आले. यावेळी डॉ. सारिका पाटील म्हणाल्या, आयुर्वेदातील उपचार पद्धतीमध्ये वनौषधी, वनस्पतीजन्य औषधी, आहाराविषयक नियम, व्यायामाचे विविध प्रकार आणि त्याद्वारे शरिरातील नैसर्गिक प्रतिकार शक्तीला वाढविण्यावर भर दिला जातो. यावेळी पाचेगावचे सरपंच श्रीकांत पवार, टाकळीभानचे उपसरपंच कान्हा खंडागळे, डॉ. अंजली पाटील, डॉ. शिल्पा सुरेश कवडे, डॉ. सचिन जीवनराव माने, डॉ. नंदकिशोर नलावडे, डॉ. केतन गोविंदराव जंगले, डॉ. दीपक तानाजी शिंदे, डॉ. संग्राम इंडोरे, डॉ. उषा रविंद्र देशमुख, डॉ. दत्तात्रय साळुंके, डॉ. स्वाती भगवान बाली, डॉ. प्रगती कासटी, डॉ. प्रियंका जयपालसिंग बंडवाल, डॉ. अभिजित मोहनराव पाटील, डॉ.सागर रघुनाथ म्हात्रे, डॉ. वंदना ज्ञानोबा वाघमारे, डॉ. ममता रामगोपाल बिहाणी, डॉ. रविंद्र घायवटे, डॉ. रघुनाथ राऊत, डॉ. अर्चना शेंडे आदींनी मार्गदर्शन केले.